जसं मनात आलं तसं!

काही शब्द...
काही विचार...
काही मनाचे ठसे...
जे मनातून उमटले...
जसं मनात आलं तसं!

लेखक
नीळकंठ कुलकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

जसं मनात आलं तसं

नीळकंठ कुलकर्णी

जसं मनात आलं तसं

लेखक: नीळकंठ कुलकर्णी

पत्ता: फ्लॅट नं. C- 8 यशश्री अपार्टमेंट. तावरे कॉलनी पुणे. ४११००९.

मोबाईल: ९८५०१८०३४९

मुखपृष्ठ- नीळकंठ कुलकर्णी

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : २९ सप्टेंबर २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २७५ /- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- नीळकंठ कुलकर्णी - ९८५०१८०३४९

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- ह्या पुस्तकाचा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

मनोगत:

गणरायाच्या चरणी नतमस्तक होऊन!
आपण आपल्या आयुष्यात अनेक गोष्टी किंवा प्रसंग पहातो.
दररोज आपला अनेक लोकांशी काही ना काही कारणाने संपर्क होत असतो व विचार विनिमय होत असतो.
तेव्हा परस्पर विरोधी गोष्टी पण दिसतात अनुभवात येतात.
माझ्या कविता छंद रहित असून वेळोवेळी प्रसंगानुसार सुचलेल्या आहेत.
ते माझे वैयक्तिक विचार आहेत.
याचा मुख्य उद्देश केवळ ज्ञान नीती आणि मानवी मूल्ये यांवर प्रकाश टाकणे हाच आहे.
त्यातून कोणाही व्यक्तीच्या भावना दुखावण्याचा हेतू नाही तसेच कुठल्याही समाज किंवा जात धर्म किंवा पंथ यांना दुखविण्याचा अजिबात हेतू नाही.
जर नकळत कोणाच्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर तो केवळ योगायोग आहे. हेतू नाहीच नाही!
समाज मनाचा वेध घेण्याचा हा एक प्रयत्न आहे!

आपला.
नीळकंठ कुलकर्णी.

लेखक परिचय:

श्री.नीळकंठ दत्तात्रेय कुलकर्णी.
फ्लॅट नं. C- 8 यशश्री अपार्टमेंट. तावरे कॉलनी पुणे. ४११००९.
मोबाईल नं. ९८५०१८०३४९
शिक्षण. एम्.एस्.सी.
नोकरी. पब्लिक सेक्टर.औषध कंपनी.पिंपरी पुणे.
रिटायर्ड. ७८ वर्षे वय
पूर्वी. एक स्वरचित कविता आरती संग्रह प्रकाशित करण्यात आला आहे.

प्रस्तावना

‘नावात काय आहे?’ असं म्हटलं जातं. पण जगातलं कोणतंही पुस्तक घ्या; पुस्तकाचं नाव (म्हणजे शीर्षक), त्या पुस्तकाचा काही ना काही स्वभाव सांगून जात असतं. ‘पु.लं.’चं ‘व्यक्ती आणि वल्ली’ असो किंवा मराठी साहित्यात गाजलेली ‘चिमणरावाचे चऱ्हाट’, ‘बनगरवाडी’, ‘मृत्युंजय’, ‘श्यामची आई’ यांसारखी पुस्तके असोत, पुस्तकाच्या शीर्षकाने पुस्तकाबद्दल काही अर्थ सूचित केला नाही, असं सहसा होत नाही.
या पार्श्वभूमीवर, आता तुमच्या हातात असलेल्या श्री. नीळकंठ कुलकर्णी यांच्या काव्यसंग्रहाचं शीर्षक पाहा — ‘जसं मनात आलं तसं’.

फक्त शीर्षकावरूनच या काव्यसंग्रहातील कवितांच्या स्वभावाचा अंदाज आपल्याला सहजपणे येऊ लागतो आणि पुढे जाऊन आतील कविता वाचताना तो अंदाज चुकत नाही. या कवितासंग्रहातल्या कविता सरळ, सोप्या आणि मनातील विचार मुक्तपणे मांडणाऱ्या आहेत, हा अनुभव हे पुस्तक नुसतं चाळताना देखील येतो. कवितेतील यमक, वृत्त, मीटर, मात्रा वगैरे डोलारा (किंवा रचनेचा खटाटोप) बाजूला ठेवून कवीने ‘जसं मनात आलं तसं’ व्यक्त होत या कवितासंग्रहातील प्रत्येक कविता लिहिलेली आहे, हे आपल्याला पहिल्या काही कवितांच्या वाचनातच लक्षात येतं.

वाचकाचे लक्ष वेधणाऱ्या कविता

या पुस्तकाचे कर्ते कवी श्री. नीळकंठ कुलकर्णी शिक्षणाने एम.एस्सी. आहेत. शास्त्रातील मास्टर्स पदवी घेतलेल्या, पब्लिक सेक्टरमधील औषध कंपनीत काम केलेल्या आणि आज निवृत्त असलेल्या या ७८ वर्षीय ज्येष्ठ

कवीने गेल्या १३-१४ वर्षांत लिहिलेल्या कविता या संग्रहात आहेत. कवितांची सुरुवात सन २०१२ पासूनची आहे. म्हणजे कवीने वयाच्या ६५-६६ व्या वर्षी लेखणी हातात घेऊन काव्यलेखन सुरू केले आहे. हे वय जगाचा अनुभव पचवून-रिचवून विचार पक्के झालेले वय असते. विचारात कसलाही गोंधळ नसतो. श्री. नीळकंठ कुलकर्णी यांनी त्यांच्या लहानपणापासूनच्या आठवणी, गिरवलेले धडे, पाहिलेली माणसे, ऐकलेले-वाचलेले थोरामोठ्यांचे विचार आणि एकूणच आयुष्यात घेतलेल्या अनुभवांचा अर्क त्यांच्या कवितांमध्ये साठवला आहे. आजच्या वाचकांसाठी तो सुबोध तर आहेच, पण दिशादर्शकही आहे.
'अरे, कुठे नेऊन ठेवलाय समाज माझा?' असा सवाल करणारे व वाचकाचे लक्ष तिथे वेधणारे विचार कवी श्री. नीळकंठ कुलकर्णी यांनी कवितेत मांडले असणार, हा कयास पुस्तकाचे नुसते मुखपृष्ठ पाहूनही बांधता येतो.

देव, देश अन् धर्मासाठी...

नीळकंठ कुलकर्णी यांची कविता प्रांजळ आहे. जे दिसलं, जे पाहिलं, जे वाचलं, जे ऐकलं, त्यावरून 'जे मनात आलं ते जसंच्या तसं' मांडण्याचा कवीचा प्रयत्न आहे. मनात कसलाही गोंधळ नाही, विचार स्पष्ट आणि पक्के आहेत. मनात चिंता असली, तर तीही जशीच्या तशी आपल्या स्पष्ट शब्दांत कवीने मांडली आहे.
कवीने शास्त्रात मास्टर्स केलेलं आहे. त्यामुळे विनाकारण अतिशयोक्ती, स्वप्नाळूपणा, कल्पनेतील जग किंवा भाबडी अलंकारिक भाषा तुम्हाला कवितेत कुठेही दिसणार नाही. इंग्रजी शब्द वापरून सांगायचं तर,

कवीच्या सगळ्या कविता या no-nonsense प्रकारच्या आहेत. शिक्षण शास्त्रविषयात झालेलं असलं, रसायन व औषधविषयक कंपनीत काम केलेलं असलं, तरी कवीने विचाराने आणि पिंडाने 'देव, देश आणि धर्म' या तीन विषयांवर सखोल मनन-चिंतन केलेलं दिसतं. कदाचित याच मनन-चिंतनाने त्यांना काव्यप्रेरणा दिली असावी.

या पुस्तकातील कवितेत 'स्व' आणि 'आत्मपुराण' नाही

सामान्यतः मराठी कवितेत स्वतःच्या व्यक्तिगत आठवणी, नातेवाईक, मित्र, आप्तेष्ट, पूर्वाश्रमीचे सफल किंवा विफल झालेले प्रेम, विरह, त्यातली आशा-निराशा किंवा चिडचिड वा सुडाची भावना — अशा स्वानुभवांची पुडकी कवितेत उलगडलेली आपल्याला नेहमी दिसतात. पण नीळकंठ कुलकर्णी यांनी हे दोष आपल्या कवितांमध्ये येऊ दिलेले नाहीत किंवा स्वतःबद्दल बढाया मारण्याचा / बोलण्याचा कवीचा स्वभावच नाही.

अशा कविता शंभर नंबरी सोन्यासारख्या, कसलीही 'स्व'विषयक भेसळ नसलेल्या असतात. 'जसं मनात आलं तसं' या कवितासंग्रहातील कविता या वैशिष्ट्याने युक्त आहेत.

बहुभाषिकतेचा स्पर्श

या संग्रहातील बहुसंख्य कविता मराठी असल्या तरी काही इंग्रजी, हिंदी वा मिश्रभाषिक स्वरूपाच्याही आहेत. सामान्यतः आपण मातृभाषेत विचार आणि चिंतन करतो. पण काही वेळा समोरचं दृश्य आपल्यापुढे हिंदी वा इंग्रजीत उलगडतं, व्यक्त होतं. अशा वेळी त्याचं मराठीकरण

करण्याचा अट्टाहास न करता, जसं मनात आलं तसं, त्या भाषेत व्यक्त होणं अधिक परिणामकारक ठरतं.
कवीच्या या संग्रहातील काही हिंदी, इंग्रजी किंवा संमिश्र भाषेत आलेल्या कविता त्या प्रकारात बसणाऱ्या आहेत.

चिंतनीय कवितांचा गुच्छ

'जसं मनात आलं तसं' हा नीळकंठ कुलकर्णी यांचा कवितासंग्रह म्हणजे चिंतनीय स्वरूपाच्या वाचनीय कवितांचा एक गुच्छ आहे. या प्रस्तावनेत आलेल्या वरील मुद्द्यांवरून कदाचित असा समज होईल की या कवीच्या कविता कोरड्या, रखरखीत किंवा मनाचा ओलावा नसलेल्या असाव्यात. पण हा अंदाज खोटा ठरवणाऱ्या हळुवार कविताही तुम्हाला या संग्रहात अधूनमधून भेटतील.

कवीने खालील ओळींत केलेलं हे पुण्यातील पावसाचं वर्णन पाहा:

रिमझिम रिमझिम पाऊस आला!
धरणी हसली, रंगही हसले,
मुग्ध होऊनी, सजीव हसले,
पाण्याचे हे थेंब मुखावर,
सहस्र चमचम सूर्य मुखावर,
पाण्याचे हे थेंब फुलांवर,
प्रीतीचे जणू शब्द अनावर.

विस्तारभयास्तव आणि प्रस्तावना शक्य तितकी संक्षिप्त असावी या निर्धाराने या संग्रहातील कवितांच्या अनेक ओळी व उदाहरणे येथे उद्धृत केलेली नाहीत; कारण वाचक पुढल्या काही क्षणांत त्या कविता स्वतः वाचणार आहेत.

श्री. नीळकंठ कुलकर्णी हे माझे मामेभाऊ आहेत. लहानपणापासून मी त्यांना पाहत आलो आहे. एका अंतर्बाह्य निर्मळ विचारांच्या कुटुंबातील ते एक सदस्य आहेत. ते एक पुणेकरही आहेत. पुण्यात राहून 'त्या' विशिष्ट पुणेरी दोषांपासून मुक्त राहण्यासाठी स्वच्छ मनाची एक भक्कम बैठक आवश्यक असते. ती श्री. नीळकंठ कुलकर्णी यांच्या व्यासंगी परिवारात मुळातच आहे. त्या व्यासंगीपणाची जोड त्यांच्या या कवितांच्या लेखनाला मिळालेली स्पष्ट दिसते.
या कवितासंग्रहाला माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा. यापुढेही श्री. नीळकंठ कुलकर्णी यांच्या हातून विपुल लेखन घडो या सदिच्छा व्यक्त करून या प्रस्तावनेला इथे विराम देतो. धन्यवाद.

— माधव शिरवळकर

प्रस्तावनाकाराचा अल्प परिचय:

माधव शिरवळकर

• मराठीत कथा, कादंबरी, नाटके आदि पुस्तकांचे लेखन.
• ज्ञानकोशकार केतकरांच्या २३ ज्ञानकोश खंडांच्या ketkardnyankosh.in या सर्वेक्त स्वरुपातील विशाल संकेतस्थळासह अनेक पुरस्कार प्राप्त मराठी संकेतस्थळांची निर्मिती.
• सलग १८ वर्षे 'नागरिक' साप्ताहिकाचे संपादन. त्या दरम्यान औद्योगिक स्मशानशांतता या अग्रलेखासाठी पत्रकार संघाचा डहाणूकर पुरस्कार
• 'संगणक प्रकाशन' ची स्थापना व त्या अंतर्गत विविध पुस्तके व ई बुक्स चे प्रकाशन व ॲमेझॉन वर वितरण, वर्ल्ड बुक फेअर मध्ये सहभाग.
• महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळा'च्या बालविज्ञान कोशासाठी सल्लागार म्हणून काम.

विविध वृत्तपत्रांत सदर लेखन

१. संगणक जगत (लोकसत्ता' २००१).
२. लॉगिन (महाराष्ट्र टाइम्स', २००३).
३. दै. लोकमत (२०१३-१४).
४. दै. पुण्यनगरी (२०१२).
५. सा. शहर मुंबई (२०१४-१५-१६)

संगणकीय तंत्रज्ञानविषयक मोठ्या प्रकल्पांची जबाबदारी / सल्लागार

१. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया लायब्ररी डिजिटायझेशन.
२. एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई लायब्ररी डिजिटायझेशन.
३. गव्हर्नमेंट गॅझेटियर्स (महाराष्ट सरकार) डिजिटायझेशन.
४. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या शिवकालिन व पेशवेकालिन एक लाख दुर्मिज ऐतिहासिक कागदपत्रांचे डिजिटायझेशन.

ग्रंथालय विषयक प्रत्यक्ष कार्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे' या जिल्हा ग्रंथालयाचा मानद कार्यवाह म्हणून ३ वर्षे काम..

अध्यापन

पत्रकारिता, जाहिरात व संगणकाचे माध्यमविषयक तंत्रज्ञान ह्या विषयाचे अनेक वर्षे अध्यापन.

१. सेंट झेवियर कॉलेज (मराठी पत्रकारिता विभाग), मुंबई
२. सोमय्या कॉलेज ऑफ मास कम्युनिकेशन, मुंबई,
३. मुंबई मराठी पत्रकार संघ.

अर्पणपत्रिका

माझे वडील श्री.दत्तोपंत कुलकर्णी आई सौ. सुमती कुलकर्णी.

माझे वडील त्याकाळी व्हर्नाकुलर फायनल पर्यंत शिकले.

कौटुंबिक जबाबदारी मुळे खाजगी नोकरीत रुजू झाले.आई धार्मिक व घर संभाळून होती.माझे वडील नाना सर्व सांभाळून संगीत नाटक व इतर सामाजिक नाटके पहात होते.बालगंधर्व त्यांचे आवडते कलाकार व गायक होते.मी पण त्यांच्या संस्कारात वाढलो.

आज त्यांचीच आठवण येते आहे.आणि म्हणूनच हा कवितासंग्रह त्या दोघांना अर्पण करत आहे!

- नीळकंठ कुलकर्णी

अनुक्रमणिका

१. श्री गणेश जयंती निमित्त !	१
२. अंधार-एक तेजाची खाण !	६
३. श्रद्धा	८
४. वाघ म्हणाला माणसाला !	९
५. मन एक पेन्दुलम !	११
६. सार्थ मराठी - गणेश अथर्वशीर्ष!	१२
७. पुणेरी रिमझिम पाउस!	१८
८. निसर्ग देवाला साकडं	२०
९. जनता आणि लोकशाही	२३
१०. हिरण्य गर्भ बीज	२४
११. उषःकाल होता होता	२६
१२. ब्रह्मरूप कवडसा !	२८
१३. चला लिहू या नव धर्म शास्त्र हे !	३०
१४. Global Ganesha Song!	३२
१५. विठ्ठल मी कोंडला	३४
१६. अजुनी रुसूनी आहे	३६
१७. अच्छा हुआ, नव वर्ष ने याद दिलाया!	३८
१८. प्रेषितांनो परत फिरा रे !	३९

१९. माय मराठी! ४१
२०. हे वेड मज लागले ! ४३
२१. रंग वेगळा, ढंग आगळा ! ४५
२२. असे का म्हणावे ? असे का म्हणावे? ४६
२३. अभी कुछ करने की तमन्ना है ४८
२४. भरवसा नाय !! ५०
२५. Oh! my God! Oh my God! ५२
२६. मी मराठी! ५४
२७. हम हिंदुस्थानी! ५६
२८. धर्म आणि मन! ५८
२९. जसं मनात आलं तसं! ६०
३०. Man and Religion! ६३
३१. Happy New Year! ६५
३२. I love my India! ६७
३३. चला बोलू या धर्मावरती! ६९
३४. मी ७१
३५. God particles and Demon particles!! ७२
३६. Tick tick वाजते डोक्यात ! ७४
३७. मी पुन्हा येईन!! ७७
३८. संयम है भगवान! ७९
३९. सच बोलो। ८०

४०. Women and Religions! ८१
४१. भय इथले संपत नाही! ८२
४२. मीठाचा धर्म आणि धर्माचं मीठ! ८३
४३. सरळमार्ग आणि वळणं! ८५
४४. एक दिन ऐसा भी आयेगा! ८७
४५. My dear brothers and sisters! ८९
४६. म्हणे आम्ही इतिहासातून शिकतो! ९१
४७. मी पुन्हा येईन!!जसं मनात आलं तसं! ९३
४८. सब का मालिक और निसर्ग! ९५
४९. Religion and co- existence! ९८
५०. संभवामि! १००
५१. साँप और दोरी! १०१
५२. भाकरी! १०२
५३. Consciousness! १०४
५४. जसं मनात आलं तसं! १०६
५५. Nursary Rhyme! १०९
५६. अमंगल मानव १११
५७. श्रद्धा आणि कष्ट ११३
५८. शाश्वत ! ११४
५९. हरे कृष्ण ! ११५

श्री गणेश जयंती निमित्त !

धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे!
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे!
ए एरे
ए एरे मोरयारे.
ए एरे
ए एरे मोरयारे बारा हि महिनोंमे आती है, चतुर्थी,
साथमे वो लाती है, संकष्टी चतुर्थी!
ए एरे
ए एरे मोरयारे.
ए एरे
ए एरे मोरयारे.

चैत्रमे आता है वर्षारंभ, पाडवा !
वर्षारंभ करता है, गणेश गोडवा !
वैशाख में आती है, वैशाख की तृतिया,
जीवनमे लाती है सभी, वो सुखिया !
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे!
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे!

ए एरे
ए एरे मोरयारे.
ए एरे
ए एरे मोरयारे.

जेष्ठ मे आती है, सती सावित्री,
गणेश कि पूजामेभी, दंग है स्त्री !
आषाढ में आती है, विठ्ठल पालकी,
सुरवात में होती है, गणेशकी गायकी !
श्रावण का महिना, सबसे बड़ा प्यारा,
गणेश पूजाका तो, हर दिन है नारा !
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे!
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे!
ए एरे
ए एरे मोरयारे.
ए एरे
ए एरे मोरयारे.

भाद्रपद महिना तो मोरयाको खास,
गणपतीकी पूजा, होती है खास !
बच्चा हो या बुढा, सबको है वो प्यारा.
दस दिन तक होता है, मोरया का नारा !
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे !
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे !
ए एरे
ए एरे मोरयारे.
ए एरे
ए एरे मोरयारे.

आश्विन में होती है, देवी कि पूजा,
साथ में भी होती है, गणेशजी कि पूजा!
गणेश से होती है, मंगल कार्य पूजा,
बाद में होती है, बाकी सर्व पूजा।
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे।
चिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे।
ए एरे
ए एरे मोरयारे.
ए एरे
ए एरे मोरयारे.

कार्तिक का मास, सबको बड़ा प्यारा,
दिवालीका मौसम, होता बडा न्यारा !
हर दिन होता है, गणपतिका नारा!
घर हो या धंधा, सबको है वो दुलारा !
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे।
चिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे।
ए एरे
ए एरे मोरयारे.
ए एरे
ए एरे मोरयारे.

मार्गशीर्ष महिना, तो दत्त महाराजका महिमा !
गुरुचरित्र में भी लिखा है, गणेशजीका महिमा।
पौष में तो होती है, मकरसंक्रांती !
तिळगुळ खानेसे, उभरती है, कांती!
तिळगुळ का लड्डू, बाप्पा को प्यारा,
लेन देन से सबका बढ़ता है नारा!
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे।
चिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे।
ए एरे
ए एरे मोरयारे.
ए एरे
ए एरे मोरयारे.

माघ का महिना, गणेश पिताका महिमा !
शिवरात्री का दिन, महादेव का महिमा!
गणेशजीकी जयंती, विनायकी चतुर्थी !
विनायकी हो या संकष्टी, भक्तोपर है दृष्टी!
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे!
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे!
ए एरे
ए एरे मोरयारे
ए एरे
ए एरे मोरयारे.

फाल्गुन महिना आया, होळी साथ लाया!
साल भरके दोष, होलीमे जला, दिया.
गणेशजीकी कृपासे नववर्षारंभ आया,
गणेश भाक्तिका नारा सबको मन भाया!!
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे !
धिंक चिका धिंक चिका धिंक चिकारे!
ए एरे
ए एरे मोरयारे.
ए एरे
ए एरे मोरयारे..

- नीळकंठ.
१७.१.२०१२

अंधार-एक तेजाची खाण !

एक असतं आकाश,
त्यालाच म्हणतात अवकाश!
सगळीकडे अंधार, नव्हता कुठे प्रकाश!
अंधार हाच स्थायी भाव।
प्रकाश हा अपवाद !
जसे मरण आहे शाश्वत, अन जीवन आहे अपवाद !
प्रकाश बुडाला अंधारात, अन
कृष्ण विवरे बनतात .
कृष्ण विवरे तृप्त, प्रकाश झाला लुप्त !
घर घर फिरली, गडबडा लोळली, अन
हिरण्य गर्भ बनली!
काळ्या कुट्ट अंधारात,
जसा दिसतो काजवा !
प्रकाश नव्हता अवकाशात,
काजव्यांची झाली टक्कर!
अवकाश पण टरकले !
बिग बॅग झाले, अवकाश एकदाचे सुटले !
नवी विटी, नव राज्य, प्रकाश पण सुटले !
अंधारातून, प्रकाशाकडे,
प्रकाशातून, अंधाराकडे.
पंचमहाभूताकडून सजीवाकडे!

सजीवाकडून मरणाकडे! अन
अंधार, प्रकाशाच्या खेळाकडे !
प्रकाश हरला तरी, पुन्हा पुन्हा खेळणार !
अंधाराच्या गर्भातच असे तेजाचा उषःकाल !

- नीलकंठ.
२५.२.२०१२

श्रद्धा

श्रद्धा नाही कोठे, देव हि दगड,

श्रद्धा होता सगुण, दगड हि देव!

श्रद्धा असू द्यावी, जणू इच्छित बाण,

श्रद्धा असू द्यावी, जणू मंतरलेला बाण!

श्रद्धा असे मनी, सकारात्मक गुण,

देव हि पावतो दगड असून!

नाही की हो मन, पराजयाची खाण !

मन असू द्यावे, समाधानाची खाण !

- नीळकंठ.

१९.११.२०१२

वाघ म्हणाला माणसाला !

वाघ म्हणाला माणसाला,

आमच्या घरी, नेहमी घुसता!

जंगलात येऊन पिकनिक करता!

ससा,हरीण मारून,ढेकर देता!

मग आम्हीच काय घोडं मारलं?

मीच, तुमचं फक्त घर पाहिलं!

आम्हाला काहीच मिळत नाही !

म्हणूनच धरली शेळी फक्त!

किती नाटकं करतोस माणसां ?

आमच्याच घरी येऊन शिकार करता!

मग आम्ही काय बांगड्या भरल्यात?

तू ,आमच्या घरी येऊ नकोस,

मलाही सिमेंटच्या जंगलात रस नाही!

आलास तर याद राख,tit for tat आहे!

ससा सुद्धा मारायचा नाही!

कारण तो आमचा आहे!

आमचे आम्ही बघून घेऊ,

तुमच्या घरी केव्हा येऊ?

माणसांची संख्या खूपच वाढलीय,

निसर्गाला हे चालत नाही!

तुला फक्त पैसा हवाय!

पैशाला काहीच चव नाही,

"वाघ बचाव"हि खरं नाही!

आम्हाला मात्र निसर्गच हवाय!

आम्हाला फक्त निसर्गच हवाय!!!

- नीळकंठ.

२४.१.२०१२

मन एक पेन्दुलम !

सदगुण तो देव, दुर्गुण, दानव.

दोन्हीची भेसळ, असे तो मानव !

एक असे धन, एक असे ऋण !

सदा फिरे मानव, जसा पेन्दुलम !

सदगुण, जसे मोती, दुर्लभ सागरी.

सदगुण दुर्लभ, दुर्गुण सागरी !

धर्म सांगे, सदगुण, परी रुढींचे पांघरुण

झाकाळते सदगुण ! रुढींचेच कारण !

धर्माचीच रुढी, मनामध्ये अढी !

समजून सर्वही, कशाला मग लढी?

तोडिता हि रुढी, धर्म झाला क्रोधी !

रुढी सांगता, सांगता, सदगुणी झाला लोभी !

सदगुण विचारी, सदगुण आचारी,

कशाला हवी सर्वां, दुर्गुण लाचारी?

- नीळकंठ. ४.३.२०१२

सार्थ मराठी - गणेश अथर्वशीर्ष!

ओंकार गणेशा नमन करावे,

चित्त शुद्ध साधन, असावे,

तूच ब्रम्हा प्रत्यक्ष,तूच निर्माता सृष्टीचा नित्य!

तूच पालन करता असुनी,तूच एक विनाशी तत्व!

कसे करावे तुझे वर्णन ?सर्व व्यापक अविनाशी तत्व!

सर्व जाणती हेच यथार्थ , त्रिकालाबाधित सत्य!

नमन करितो तुझ्या चरणी,रक्षण करण्या विनंती,

ऐकतो मी,बोलतो मी, तव गुणांची उपासनाच ती!

भक्ती करावी अखंड,परंतू विघ्ने का यावी प्रचंड?

विनंती माझी तुझा चरणी,विघ्ने न यावी भक्तीत!

सर्व दिशा स्वातंत्र्य ,सर्वा मिळावे भक्तीत!

वाणी अन जीव स्वरूप. नामरूपात्मक तू.

सत, चित,आनंद तू, एकमेवद्वितीय तू!

ज्ञान ,विज्ञान, प्रत्यक्ष तू ,ब्रह्म तूच साक्षात.

सर्व जीव,निर्जीव,उत्पन्न करुनी ,तूच रक्षितो साक्षात,

कालनिर्णय नाशक तूच,सर्व शरण तव चरणी साक्षात!

तूच भूमी:,तूच आपो ,नलो ऽ निलो ऽ नभ: साक्षात!.

तूच परा,पश्यंती,तूच मध्यमा,वैखरी, तूच जाणतो वाणी साक्षात..

सत्त्व,रज,तम त्रिगुण धारक, जागृती,स्वप्न,सुषुप्ती हि तूच!

स्थूल,सूक्ष्म,कारक,आनंद मय कारक हि तूच,

भूत,वर्तमान आणि भविष्य हि तूच!

मूलाधार चक्रे नित्य, असे वास तुझा तेथेच!

त्रिविध शक्ती तूच, जीवन,स्थैर्य स्थिती अन नाशकारक.

जीवन्मुक्त योगी ,ध्यान धारणा निरंतर!

तूच सृष्टीकर्ता ब्रह्म देव,तूच पालक विष्णू नाम.

तूच नाशक,संहारक ,रुद्र धारक,शिव नाम.

ऐश्वर्याचा भोग घेत , तूच भोक्ता इंद्र नाम.

प्रज्वलक अग्नी तूच, सजीवांचा श्वास हि तूच,

तमसोऽमा ज्योतिर्गमय हि तूच ,शीतल चंद्र तूच!

संजीवक जीव ब्रह्म तू, धरणी,आकाश, ओंकार हि तूच!

गण जरी पहिला शब्द, ग कार प्रथम उच्चारी ,

पहिला वर्ण अ कार, ग कार नंतर उच्चारी!

पुढे अनुस्वार,अर्धचंद्रांकित, अनुनासिक उच्चारी,

ध्यानी असावा प्रथम प्रणव, गं कार नंतर उच्चारी !,

ओम गं, प्रथम मंत्रोच्चार, गणपतये नमः तदनंतर!

गं असे ब्रह्म,अकार विष्णू रूप,शिवरूप तो अनुस्वार,

अनुनासिक हे सूर्य समान,ओंकार तो शक्ति रूप!

जाणुनी करता मंत्र पठण,सर्व जाणतो एकरूप!

करिता ध्यान वक्रतुंडाचे,जाणतो मी एकदंत!

त्वमेव-तोच एक, देतो प्रेणना, सर्वांसी अनंत!

आता सांगतो, रूप गणेशाचे,ध्यानी भक्ती अनंत.

एकदंतं,चतुर्हस्तं , रक्तवर्ण विनायक,

शूर्पकर्ण,लालवस्त्र, रक्तचंदन उटी धारक ,

रक्त पुष्प विभूषित, भक्त कृपा कारक,

सर्व जगत कारण तू! पुरुष,प्रकृती सर्व श्रेष्ठ तू!

असा गणेश पूजितो, ध्यान निरंतर अर्पितो,

तोच योगी निरंतर, सर्व श्रेष्ठ ठाकतो!

नमन करावे गणेशा, देव समुदाय स्वामीला,

नमस्कार त्या गण पतीला ,प्रथम गण अधिपतीला!

पूजितात सर्व जन ,एकदंत, विघ्नेश, असा तोच लंबोदर!

तोच असे श्री वरदमूर्ती, अन शिव पार्वती पुत्तर!

कशी सांगावी फलश्रुती?नित्य साधना करावी!

करता पठण नित्य, ब्रह्म स्वरूप येते नित्य,

विघ्न बाधा दूर होती, सुखप्राप्ती होते नित्य!

पंच महापातके नष्ट, विघ्न मुक्त असे नित्य.

पठण करिता सायंकाळी ,दिवसांची पापे नष्ट,

पठण करिता प्रातःकाले,रात्रीची पापे नष्ट! .

पठण करिता दोन्ही वेळा ,निष्पाप ,सज्जन ते होती.

करिता पठण सदासर्वकाळ ,धर्म,अर्थ,काम,मोक्ष, सर्व लाभती!

नका शिकवू हे अथर्व शीर्ष , नसता श्रद्धा वा आदर,

शिकवलं जरी लोभाने, परिणाम होईल सादर!

करिता पठण सहस्र वेळा, जे जे वांछील, ते ते सादर!

पठण आदि अभिषेक गणेशा,उत्तम वक्ता, प्राप्त!

उपवास,जप-जाप्य चतुर्थीला,विद्या होईल प्राप्त!

अथर्वण ऋषींचे हे वचन, करू या सर्वांनी प्राप्त.

दुर्वा हवन ,धन प्राप्ती, लाह्या हवन देई, बुद्धी अन यश प्राप्त,

सहस्र मोदक, होम-हवन करिता,इष्ट फळ प्राप्त!

तूप युक्त समिधा हवन, सर्व,सर्वकाही प्राप्त!

शिकवावे आठ ब्राह्मणा, अथर्वशीर्ष हे उत्तम,

होतसे जीवन तुमचे, सूर्य समान उत्तम!

करिता पठण, नदी तीरावर, ग्रहणकाले उत्तम ,

महाक्षेत्रे,गणेश क्षेत्रे,जप करिता, सिद्धमंत्र अति उत्तम.

जप कर्ता होईल मुक्त, महाविघ्न वा महादोशातहि

महापातकातहि होईल मुक्त, हे जाणतो तोच यथार्थ,ज्ञानी हि!

असे, अथर्वण उपनिषद समाप्त!

नित्य ऐकावे कल्याण,नित्य वदावा ओम.

नित्य पाहावे मंगल,नित्य स्मरावा ओम ,

नित्य दर्शन गणेशाचे,सुधृड काया देई ओम !

नित्य पूजन,नित्य पठण,दीर्घायुष्य देतो ओम!

सर्व मंगल कारक, नित्य कल्याण भक्ताचे,

इंद्र असो वा बृहस्पती,पुषादेव भक्ताचे!

ओम शांती! शांती!! शांती!!!

असे,हे,गणपती अथर्व शीर्ष सफल संपूर्ण !

- नीळकंठ. भाद्रपद-गणेश चतुर्थी

१९.०९.२०१२

पुणेरी रिमझिम पाउस!

रिमझिम रिमझिम पाऊस आला !

हसत सूर्यहि, ढगातून आला !

धरणी हसली, रंगही हसले,

मुग्ध होऊनी, सजीव हसले !

पाण्याचे हे थेंब मुखावर,

सहस्र चम चम सूर्य, मुखावर !

पाण्याचे हे थेंब फुलांवर,

प्रीतीचे जणू, शब्द अनावर

रिमझिम रिमझिम पाऊस आला !

हसत सूर्यहि, ढगातून आला !

सोन्याचा हा, किरण दिसे मज,

दिसे किरण जणू, आशेचा समज .

झिम झिम, झेलुनी, मने विलसती !

शब्दच जणू हे झिम, झिम करती,

आठवणींच्या धारा बरसती !

आठवणींची हि पाने फुलवती.

रिमझिम रिमझिम पाऊस आला !

हसत सूर्यहि, ढगातून आला!

असाच रिमझिम, पडत राहावा,

आठवणींना खंड न पडावा !

वेळेचाही बंध नसावा,

पण आठवणींचा गंध रहावा.

रिमझिमणारा सुगंध दरवळले

अन प्रीतीचे हे गुपित कळले !

रिमझिम रिमझिम पाऊस आला !

हसत सूर्यहि, ढगातून आला!

- नीळकंठ.

३०.९.२०१२

निसर्ग देवाला साकडं

शेपटीवाल्या प्राण्यांची सभा भरली !

माणसांवरच्या तक्रारींनी सभा रंगली !

माकड म्हणाले, माणूस मोठा खोटा !

कानामागून आला, अन तिखट झाला मोठा!

शेपूट नाही म्हणून, उच्च मानतो स्वतः ला,

पण कसा आहे माणूस? माहिती का तुम्हाला?

वंशज जरी आपला , तरी स्वार्थी आहे साला।

आपलेच गुण असूनही, माकड म्हणतो मला।

का करतो प्राण्यांची चेष्टा, गाढव आहे मेला!

कुत्रा म्हणाला, असा कसा हा मालक मला?

स्वतः जरी बेईमान, मला म्हणतो राख इमान !

चोर जरी पकडून दिला, माझच घेतो इनाम !

साहेबा पुढे गोंडा घोळी, मला म्हणतो गुप चिळी.

पुढार्यांचे शब्द झेलती, माझे मात्र कान पिळी!

मांजर म्हणाले, म्याऊ, म्याऊ, डोळे मिटून दुध पिऊ,

माणूसपण माझ्या सारखेच, डोळे मिटून पैसा खाऊ!

का कोणास ठाऊक, देवाने हा निर्माण केला ऐतखाऊ !

त्याचीच तक्रार करायला, आपणच देवाकडे जाऊ!

गाढव म्हणाले, माणसांचा आला वीट,

वागत नाही आमच्याशी कधी नीट !

ओझे वाहून, वाहून आमाला येते फीट !

गाढव, गाढव म्हणून सदा मारतो मला,

अडला नारायण म्हणून कधी, सलाम करतो मला!

वाघ आला सिंह आला, सगळे एकदम म्हणाले,

माणसांना शिक्षा करू म्हणून सगळे ओरडले ।

आमच्या पेक्षा तूच वाईट, उगाच करतो शिकार!

आमने सामने, लढून करू या कि शिकार !

पिंजऱ्या मध्ये बंद करून, चालते तुझी मिजास !

साठवलेले मटन खाऊन, उगाच करतो मिजास !

तुझ्या सारखे शिळे अन्न, चालत नाही मला!

रोज पहिल्या शिकारीचे रक्त आवडते मला!

आमचा वंश झाला खलास, सृष्टीचा केला नाश!

जाणून, बुजून करतो आहेस, पर्यावरणाचा नाश!

क्षमा नाही करणार, देव कधी तुला !

स्वार्थाचा विचार कधी, सोडणार तुला?

देवाला सांगून, माकड तुझे करणार!

चांगली बुद्धी मिळून सुद्धा, देव नाही मिळणार!

चला जाऊ या लवकर, देव कुठे भेटणार?

- नीळकंठ.
१६.११.२०१२

जनता आणि लोकशाही

न्याय देवता आंधळी,

नेते झालेत गोंधळी! ।।

जनता आहे वेंधळी !

बळी तोच, कानपिळी!

गरिबी आहे दीनदुबळी.

पैसा दिसताच खुलते कळी,

देशी दारू उतरते गळी !

नेत्यांची आहे भ्रष्ट फळी,

रोजच लागते, मटणाची थाळी !

चोर सोडून, संन्याशाला बळी!

म्हणून देतात लोकशाहीचा बळी!

- नीळकंठ.

२८.१२.१२

हिरण्य गर्भ बीज

जसं बी, तसं झाड !

जसं माकड तसा माणूस !

जसा माणूस, तसं मूल!

जणू परमात्मचीच, झूल!

माकडाचं बीज, जनावर !

होतात स्वगुण, अनावर!

बीज तसं झाड, वाढतं वर,

माणसाला स्वार्थ गुणाचाच, वर !

थोडं गोड, तिखट मसाला फार !

माणूस आहे माकड,

म्हणून चेष्टा करतो भाकड, !

माणूस आहे कोल्हा,

लबाडी करून मारतो डल्ला!

माणूस जसा, कुत्रा,

भुंकतो सदान कदा.

मालकापुढे घोळू, गोंडा,

सदा करतो, दंगा !

माणूस जरी, चंगा,

घेतो, निसर्गाशी पंगा!

कसं सांगू, किती सांगू,?

या माणसाच्या कथा?

कशी काय सांगेल, देव त्याची व्यथा ?

माणूस जरी मोठा, पण वागायला खोटा !

अक्कल जरी भारी, शहाणपणाचा तोटा !

देव असा निर्जीव, कसा भासेल सजीव?

माणूस असा सजीव, मन कसं निर्जीव?

देव आहे, दानव आहे, आता मानवाची वेळ,

जणू परमात्म्याचा, हा पाठशिवणीचा खेळ !

देवानेच असा कसा, हा खेळ मांडला?

माणसाने मात्र, हा खेळ उधळला!

दिव्यावरचे किडे अन माणूस असे सारखे,

दोघेही झेपावतात, विनाशाकडे सारखे !

- नीळकंठ. १०.१.२०१३

उषःकाल होता होता

उषःकाल होता होता,

काळ रात्र झाली!

पुन्हा पुन्हा पेटवू नको हो,

धर्म, अधर्माच्या मशाली !

पुन्हा, पुन्हा आले जरी ते,

प्रेषित, दुख्खी झाले.

सांगूनही नाही कळले,

मानवाला, सत्व जीवनाचे !!

पुन्हा, पुन्हा करुनी चुका,

का घालवितो, उषःकाल?

प्रेषिताने पेटविल्या जरी त्या,

माणुसकीच्या मशाली !

नका पांघरू आता पुन्हा, अंधश्रद्धेच्या शाली !

रुढी, परंपरा, होते व्यसन,

जणू शृंखला, आहे वेसण !

धर्म, नियमन, मनुजासाठी,

मानव नसे धर्मासाठी!

आले धर्म, नी गेले धर्म,

परंतू कळले, नाही मर्म !

सतत करावे, सतत वदावे,

कर्माचे तर सत्कर्म करावे,

हेच कसे विसरलो, आपण सर्व?

हेच कर्म, हेच सर्व-धर्म-मर्म !

मानवा, कुठे निघालो, कुठे पोहचलो

कुणालाच ठाव नसे, जरी पोहचलो !

मना तू थांब जरा, मी खचलो,

मन स्वार्था पायी, मी फसलो !

उषःकाल होता होता,

काळ रात्र झाली!

पुन्हा पुन्हा पेटवू नको हो,

धर्म, अधर्माच्या मशाली !

- नीळकंठ.

३१.१.२०१३

ब्रह्मरूप कवडसा !

गांजलो, भंगलो, दिशाहीन मी,

रंगलो, दंगलो, दिशाहीन मी !

देखिला, पहिला, कवडसा तुझा !

गुंगून गेलो मी , तुला पाहण्या.

तुझेच ब्रह्म रूप खरे जाणण्या.

कधी कळेल मला तुझे, खरे रूप हे ! ॥१॥

अणू असून हि, महाकाय तू !

क्षणात तू इथे, अन क्षणात तू तिथे!

क्षणात सगुण तू, अन अनंत निर्गुण हि तू!

स्पर्श होता तुझा, जीव होतो सगुण.

देह प्राप्त होता, माया होते दुर्गुण ! ॥२॥

पंच महाभूते जणू , तुझीच लेकरे !

सर्व जीव जणू , पुढची लेकरे !

एक पेशी होता एक चित्त होते,

एक चित्त होता सुख अपर होते !

अनंत पेशी देही, अनंत विचार आले,

अनंत विचार होता, दुख हि अपार झाले ! ॥३॥

एक मन, एक विचार, एक चित्त माझे,

एक नाम घेता तुझे , सुखी आयुष्य माझे !

कधी कळेल, हे मला तुझे सांगणे,

नाम रूप कवडसाच, हेच मला सांगणे !

नाम रूप कवडसाच, हेच मला सांगणे! ॥४॥

- नीळकंठ.
१०.२.२०१३

चला लिहू या नव धर्म शास्त्र हे !

नकोत धर्म, अन नकोत वर्ण ,

युगा-युगाचे झाले हो अजीर्ण !

काळा-गोरा, पीत-गव्हाळी !

उत्क्रांतीची हि तऱ्हा निराळी .

उच्च-नीच ना, समान सगळी!

असमानातेचा धागा धरुनी ,

धर्म शास्त्र पण संकुचित करुनी,

उच्च-नीचतेचा डंका पिटुनी ,

स्वार्थच पहिला,सगळ्यांनी ,

नका फसू कुणी, आमिष देता,

स्वतंत्रतेचे विचारहि नेता ,

धर्म शास्त्रे हि विदीर्ण झाली,

स्वार्थापोटी विटंबित झाली!

माणुसकीचे प्रेषित म्हणवता,

उशीर केलात,युगे म्हणवता !

चला लिहू या शास्त्र नवे हे,

माणुसकीच्या जरतारीचे, अन ,

सुख-समृद्धीच्या धाग्यांचे हे!

जुने-पुराणे,बदलून टाका,

नवे प्रवाहहि, समजून घ्याना.

- नीळकंठ .

१७.६.२०१३

Global Ganesha Song!

Oh!Lord Ganesha , you are The Gajanan!

Oh Lord Gajamukh,you are The elephant God,

I worship you,from the bottom of my heart,

I salute you and surrender my mind,

As my mind is calm , and full of joy!

Oh! Ganesha,you are The God,and you are The Lord!

You are the Fire and you are the Water!

You are the Earth and you are the Air!

You are here and you are there,

You are always, everywhere!

You are The Universe, full of God Particles!

You are the start of Happenings!

And also, the end of Everythings!

Oh! Ganesha,you are The God,and you are The Lord!

You are the past,you are the present,

You are the only creater,of the future!

You are the one,to give us,positivity,

You are the sole,to give us vitality!

You can mould youself, in any form,

How can I mould myself,in your form?

Oh! Ganesha,you are The God,and you are The Lord!

Give me the power,show me the road!

I will not hesitate to ignore, love and money !

I offer you The Faith and the Red flowers,you like,

More valuable than gold, silver and a like!

Day and night,I worship you as a Goal,

To obtain the power and The positive sole!

Oh! Ganesha,you are The God,and you are The Lord!

- Neelakanth. 28.9.2013

विठ्ठल मी कोंडला

कोंडला रे ,कोंडला ,

विठ्ठल मी कोंडला!

हृदयी माझ्या,विठ्ठल मी कोंडला!

कशाला जाऊ आता ,तुझ्या मी मंदिरा?

मंदिरात दर्शन, पैशाला हो पासरी!

विठ्ठल वाजवितो हृदयी माझ्या बासरी!

नको धन,नको हाव, हवी मला शांती,

मनीच मी पाहतो, तुझीच चैतन्य मूर्ती!

मंदिरात देव नाही, हृदयी तोच राहतो!

माणुसकीच्या भक्ती भावे, पुन्हा ,पुन्हा भावतो!

संकटात आळविता, क्षणात समोर ठाकतो!

मनी भाव भक्तीचा असाच राहू दे,

विठ्ठल मी कोंडला,तसाच तो राहू दे!

विठ्ठल, हृदयी माझ्या सदा काळ राहू दे!

कोंडला रे ,कोंडला ,

विठ्ठल मी कोंडला!

हृदयी माझ्या ,मी विठ्ठल कोंडला !!

- नीळकंठ.

आषाढी एकादशी २०१४

अजुनी रुसूनी आहे

अजुनी रुसूनी आहे,

प्रतिभा रुसूनी आहे!

सुचता ओळी सुचेना ,

मजला गीत सुचेना!

अजुनी रुसूनी आहे .

दिसतात विषय परी जे,

भावले न माझ्या मनी ते,

जणू कापरा परी ते उडते!

का पाहुनी दुःख ह्या जगीचे ,

का गुंतुलो सुखी, ह्या जगीचे ,

प्रतिभा थिजून गेली ,

पाहता कृती मानवाची!

अजुनी रुसूनी आहे,

प्रतिभा रुसूनी आहे!

सुचता ओळी सुचेना ,

मजला गीत सुचेना!

अजुनी रुसूनी आहे .

रुसणे शाश्वत नसते ,

ज्वाला मुखीच ती असते.

प्रतिभा हृदयीच ती वसते .

अन वेळीच, अचानक प्रसवते!

विसरून सुख-दुःख जगीचे

प्रतिभाच प्रकाश देते,

प्रतिभाच दिशा देते!

अजुनी रुसूनी आहे,

प्रतिभा रुसूनी आहे!

सुचता ओळी सुचेना ,

मजला गीत सुचेना!

अजुनी रुसूनी आहे ?

- नीळकंठ .

२.२.२०१५

अच्छा हुआ, नव वर्ष ने याद दिलाया!

अच्छा हुवा, आपने नव वर्ष गाठकी बधाई दे दि!

अछा हुवा आपने, याद दिलाई कि,

मैं और एक साल से जादा बुढा जो हो गया !

बुढा होनेका डर नही मुझे, बस,

सीखनेकी तमन्ना कम नही होनी चाहिये!

अभी जो सीखूंगा,

शायद वही अगले जनम काम आ जायेगा,

कारण वही लेटेस्ट है, आत्माको पचास-साठ साल

पहलेका याद आना कठीन है!

इसलिये सिखना मत छोडो, सीखना मत भुलो,

शायद सीखनेसे उमर लंबी हो जायें, तो दूधमे शक्कर!

अच्छा हुवा, आपने नव वर्ष गाठकी बधाई दे दि!

अच्छ हुवा आपने, याद दिलाई, कि,

मैं और एक साल से जादा बुढा जो हो गया !

- नीळकंठ १२.०२.२०१५

प्रेषितांनो परत फिरा रे !

प्रेषितांनो परत फिरा रे !

माणुसकीला परत आणा रे!!

खंडित मानव,धर्मही खंडित,

कसे राहावे प्रेम अखंडित?

जन्म,मृत्यू ते निसर्ग निर्मित,

नका करू ते धर्म पुरस्कृत!

धर्म युद्ध हे नष्ट करा रे!

मानवतेला अखंड करा रे!!

प्रेषितांनो परत फिरा रे !

माणुसकीला परत आणा रे!!

खंडित होती जमीन तेव्हा,

नव्हती साधने, शोध ही तेव्हा!

निसर्ग वेगळा, राहणी वेगळी!

तेचच करती प्रथा वेगळी!

आज सर्व हे जवळ ठाकले ,

विश्व सर्व हे कुटुंब झाले!

विज्ञानाने हे सहज साधले!!

प्रेषितांनो परत फिरा रे !

माणुसकीला परत आणा रे!!

- नीळकंठ.
१६.०२.२०१५

माय मराठी!

नेमेचि येतो पावसाळा !

नेमेचि येतो हिवाळा,

तैसाचि येतो उमाळा,

मम मातृ भाषेचा!

कैसा लागेल हो लळा ?मातृ भाषेचा?

कुणी उतरवेल का, माझ्या गळा?

माय मराठी प्रेमचा हा लळा!

एकदा वर्षातून येतात हो कळा,

परंतु न कळे आमच्या बाळा .

का सांगावे वापरून बळा ?

कसा लागेल,वापरून बळा ?

लळा अपुल्या बाळा ?

जे जे होईल ते ते पाहावे ,

प्रतिवर्षी उमाळेच यावे!

जैसे उन्हाळेच मातृ बोलाचे!

लाभले हे भाग्य आम्हाला ,

प्रती वर्षी उमाळेच आम्हाला!

- नीळकंठ

२७.०२.२०१५(मराठी दिन)

हे वेड मज लागले !

हे वेड मज लागले, धर्माचे,

हे वेड मज लागले, रुढींचे,

कुणा आवडे हिरवा, कुणा आवडे केशरी,

कुष्णा आवडे निळा, तर कुणा आवडे लाल !

रंग जरी दिसती अनेक, इंद्रधनु परी एक !

मानवाचे जरी रंग वेगळे, माणुसकी परी एक !

हे वेड मज लागले, धर्माचे,

हे वेड मज लागले, रुढींचे,

हे वेड मज लागले पैश्याचे

चोरी, फसवणे हे नित्याचे!

समाधान हेचि असावे नित्याचे!

हे वेड मज लागले सत्तेचे,

असत्य बोलणे, वागणे नित्याचे !

हे वेड मज लागले, धर्माचे,

हे वेड मज लागले, रुढींचे,

हे वेड जरी निसर्गाचे,

रुढींच्या हो अति प्रेमाने,

मी हत्या करतो नित्याने,

वसुंधरेच्या हो प्राणाचे,

जरी भरभरून देते ती प्रेमाने !

हे वेड मज लागले, धर्माचे,

हे वेड मज लागले, रुढींचे,

खरा तो एकच धर्म,

माणुसकी हेच खरे मर्म !

खरी ती एकच रूढी,

मनी नसावी हो अढी !

अन गाढून टाका, द्वेषाची ती मढी !

हे वेड मज लागले, धर्माचे,

हे वेड मज लागले, रुढींचे !

- नीळकंठ.

१२.५.२०१५

रंग वेगळा, ढंग आगळा !

रंग वेगळा, ढंग आगळा,
माणसांचा हा खेळ आगळा !
रंग उडवला, रंग बदलला,
धर्म कसा हो बदलला ?
रुढी बदलली, गुढी बदलली,
ना बदलला विचार !
मित्र बदलला, श्रद्धा बदलली,
ना बदलला आचार!
शब्द बदलले, नजर बदलली,
ना बदलले अश्रू !
ना बदलला श्वास,
जरी बदलला विश्वास !
वस्त्र बदलले, शस्त्र बदलले,
ना बदलली भूक !
कसे कळावे कुणी वदावे,
परी, धर्म कसे करती दावे?
माणसेच करिती पुन्हा, पुन्हा कावे,
अन हे उजवे अन ते डावे!

- नीलकंठ.
८.९.२०१५

असे का म्हणावे ? असे का म्हणावे?

असे का म्हणावे ? असे का म्हणावे?

चुकीला नाही माफी ! असे का म्हणावे?

मरावे परी कार्तीरूपी उरावे!

असे का म्हणावे ?असे का म्हणावे?

"पुरावे" पुरावे अन दोष मुक्त उरावे!

दारी सर्व सुखे,दोषरुपी जगावे!

जगी सर्व सुखी असा कोण आहे ?

असे का म्हणावे?तसे का म्हणावे?

चुकीला नाही माफी असे का म्हणावे?

देर है ,अंधेर नही! असे का म्हणावे?

शोषितांच्या नशिबी दोन्ही का असावे?

मनी "सल"असता,जनात "मान" नाही!

दोषितांच्या नशिबी जगी मान नाही!

पुरावे चुकीचे,गृहीतहि चुकीचे ,

तपासाचे धागे,निवडले चुकीचे!

चुकीचेच गणित दिले,शास्त्र पंडिता,

म्हणे न्याय हवा लवकर दंडिता!

म्हणे न्याय हवा लवकर दंडिता!

गृहीतच बदलले,गणितच बदलले!

उत्तरा दाखल "बाकी" काय उरले?

"बाकीच" असे उरावी, "पुरावे" म्हणावे तयाला ,

कसा न्याय लागेल कधी हो तयाचा ?

"गणितच " चुकीचे म्हणती तयाला!

कल्पवृक्ष जरी म्हणती नारळाला ,

कसा आम्र येईल कधी हो तयाला?

- नीळकंठ .

१४.१२.२०१५

अभी कुछ करने की तमन्ना है

आज मुझे याद नहीं है,
लेकिन लगभग ६७ साल पहले मेरे
जीवन की शुरुआत हुई थी!
वही पहला दिन था,
जब सबने शायद ! जशन मनाया था !
आज फिर वही दिन है, लेकिन ६७ साल का बूढ़ा हूँ!
फिर भी मेरे घर वाले, मेरे बच्चे,
अब जशन मनाना चाहते हैं।
तक़दीर की बात है,
सड़सठ साल पहले,
मुझे घड़ी-घड़ी माँ के प्यार की ज़रूरत पड़ती थी!
आज भी वही प्यार की ज़रूरत है,
जो मेरे बच्चे और घरवाली मुझे दे रही हैं!
मैं तो रोज़ शुक्रिया अदा करता हूँ, भगवान से,
मेरे बच्चे, मेरे पोते सदा सुखी रहें।
मेरी कमी, अब उन्हें महसूस न होने दे।
सड़सठ साल का बूढ़ा जो हो गया हूँ!
जी हाँ, बूढ़ा जो हो गया हूँ।
अभी भी कुछ करने की तमन्ना है!
यूँ ही रास्ता ढूँढ़ रहा हूँ।

रास्ता ज़रूर मिलेगा,
जी हाँ, कहते हैं ना,
भगवान के घर देर हो सकती है, पर अँधेर नहीं!
जी हाँ, इसी को ही जीवन कहते हैं!!
अब मुझे कुछ नहीं चाहिए,
जो है, वही देना चाहता हूँ।
पैसा तो सभी देते हैं,
मगर, मैं तो शिक्षा और संस्कार देना चाहता हूँ।
पैसा तो तोड़ने का काम करता है।
इसलिए शिक्षा और संस्कार
जोड़ने की कोशिश कर रहा हूँ।
और आने वाले समय में वही करता रहूँगा।
वही करता रहूँगा।
और सभी लोग दिल से कहेंगे,
जियो हजारों साल!

- नीलकंठ
१२.०२.२०१६

भरवसा नाय !!

माणसा तुला देवावर भरवसा नाय कां?

वेगळे वेगळे धर्म हवेत कशाला तुकां !

माणसा तुला देवावर भरवसा नाय कां?

धर्म धर्म म्हणून माणसाचीच हत्या तू करतो कां?

देव, देव म्हणून, श्रद्धेचा बाजार तू मांडतोस कां?

माणसा तुला देवावर भरवसां नाय का?

वेगळे वेगळे धर्म हवेत कशाला तुकां?

माणसा तुला देवावर भरवसा नाय कां?

उच्च नीच मानून माणसालाच फसवतोस ना?

बाईला अशुद्ध ठरवून, स्वतःलाच फसवतोस ना?

देवाचा कोप सांगून, जनतेला लुबाडतोस ना?

माणसा तुला देवावर भरवसां नाय कां?

वेगळे वेगळे धर्म हवेत कशाला तुकां?

माणसा तुला देवावर भरवसां नाय का?

देवा तुला पण माणसावर भरवसा नाय का?

बुद्धि दिली, विचार दिलास पण, स्वार्थ दिलास ना?

बुद्धिच्या जोरावर, माणूस तुला टक्कर देतोय ना !

देवा तुला पण माणसावर भरवसा नाय का?

माणूस वासनेच्या खाईत पुन्हा पुन्हा फसतोय ना !

स्वार्थ, वासनेच्या अस्त्रावर देवा तुला भरवसा नाय का?

माणूस काय करणार तुला? स्वतः नाशाला कारण हाय !

माणसा तुला देवावर भरवसा नाय ना!

देवा तुला बी माणसावर भरवसा नाय ना!!!

- नीळकंठ.

२५.७.२०१७

